**संक्षिप खटला क्र. ९४/२०२३**
अजय वि. बजरंग निलू
**नि.क्र.४८**

**अर्जदारातर्फे सा.क्र.०२ यांची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,**

| | | |
|---|---|---|
| माझे पुर्ण नांव | : | अशिष अशोक सोमकुंवर |
| वय | : | ३४ वर्षे |
| व्यवसाय | : | खाजगी नोकरी |
| राहणार | : | नवीन गुजरखेडी, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर. |

**सरतपास अर्जदारातर्फे वकील श्री बांद्रे यांचे मार्फत:–**

**०१.** दिनांक ०७–१०–२०२१ रोजी सायंकाळच्या वेळी अजय मडके यांच्या घरी शिवीगाळ करण्याचा आवाज येत होता. आमच्या घरापासून त्यांच्या घराजवळचे दिसते. तेव्हा ३–४ लोक अजय मडकेच्या घरी आले होते. त्यांचा शिवीगाळ चालू होता व मारण्याची धमकि देत होते. त्यांच्यामध्ये थोडी मारामारी देखील झाली होती. तेव्हा दोन आरोपी पिशवी घेउन गेले होते. नंतर मला अजय मडकेने सांगितले कि त्यामध्ये मुळ कागदपत्र व काही पैसे होते. मी माझे वडील व दादा तेथे जाउन सोडवासोडव केली. त्यानंतर ते तेथून निघून गेले.

**सरतपास संपूर्ण**.

**उलट तपास आरोपी क्र. १ ते ४ तर्फे – श्रीमती जे.एच. शेंडे, वकील.**

**०२.** दि. ०७.१०.२०२१ च्या काळामध्ये मी नागपूर येथे टेक्नीशियन म्हणून सोलारचे काम करायचो. त्या दिवशी मी डयूटीवर गेलो होतो. त्यादिवशी माझी सकाळी

९.३० ते ५.३० डयूटी होती. त्या दिवशी मी सायंकाळी ६.३० वाजता घरी पोहचलो. हे म्हणणे खरे नाही कि, घटनेच्या वेळी मी घरी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे कि, त्यावेळी कोण कोणाला शिवीगाळ करीत होते हे मला माहिती नाही मी फक्त आवाज ऐकत होतो. हे म्हणणे खरे नाही कि, घटनेच्या वेळी मला केवळ अजय मडकेचा आवाज ऐकू येत होता. हे म्हणणे खरे नाही कि, मी घटना पाहिली नाही. मी आरोपींना नावाने ओळखत नाही. चेहरे मला आठवत होते. हे म्हणणे खरे आहे कि, कोणी कोणाला जीवे मारण्याची धमकि दिली हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे कि, कोणत्या आरोपीने पिशवी नेली हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही कि, मी अजय मडकेच्या सांगण्यावरुन आज साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही कि, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**माझ्या समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत**

THAKUR PRADEEPSINGH

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2025.07.09 11:46:53 +0530

**(प्रदिपसिंह पी. ठाकूर)**

दिनांक– ०२/०७/२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सावनेर